# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०४ व ०६ कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्हचे" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" या मोहिमेचे आयोजन**

दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" ही मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेस अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, कार्यकारी अभियंता, अग्निशमन दल अधिकारी, सहाय्यक आयुक्त, स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

प्रभाग समिती क्रमांक ०४ व ०६ कार्यक्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, सिल्वर पार्क, बालाजी हॉटेल, शिवार गार्डन, मा. आयुक्त निवास, योगी नगर ते कोर्ट नाका, नगररचना, ब्रँड फॅक्टरी, डेल्टा गार्डन व एस के स्टोन सिग्नल इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता, शाळांची स्वच्छता व मल:निसारण केंद्रास भेट देऊन आवश्यक ते उपाययोजना करणे अशी असंख्य कामे सकाळी ७.०० वाजल्यापासून दुपारी २.०० वाजेपर्यंत करून घेतली. मा. आयुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्ता सफाई मोहीम राबवली. त्याचबरोबर मा. आयुक्त यांनी मल:निसारण केंद्रास भेट देऊन दुर्गंधी येणार नाही याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. सदर "दिपावलीपूर्व डीप क्लीन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या घराची तसेच आसपासच्या परिसराची नियमितरित्या स्वच्छता राखून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.